International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Indian Streams Research Journal**
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | May - 2015 Available online at www.isrj.org

# संसदीय लोकशाही, संसदीय आयुधे व विरोधी पक्ष



**संजीवन माणिकराव कदम**
उपप्राचार्य व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, जिंतूर.

Short Profile :
Sanjivan Manikaraw Kadam is chief of the Department of Political Science and Education Board jnanopasaka arts at commerce in science, college , jintura .



## १] प्रस्तावना :

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. या व्यवस्थेत राजकीय पक्षांना अनन्य साधारण महत्व असते. साम्यवादी व सर्वंकष राज्यव्यवस्थेतही राजकीय पक्ष असतो. परंतु या व्यवस्थेत एकाच राजकीय पक्षाचे अस्तित्व असते. त्याला पर्याय व प्रतिस्पर्धी नसतो. हा पक्ष राज्यकर्त्यांच्या मर्जीनुसार कार्य करतो, तो खऱ्या अर्थाने लोकांच्या इच्छा, आकांक्षा, विचार यांचे प्रतिनिधीत्व करु शकत नाही. त्यामुळे तिथे एकपक्ष हुकूमशाही प्रस्थापित होते. लोकशाही व्यवस्थेत मात्र एकापेक्षा अधिक पक्षांचे अस्तित्व मान्य करण्यात येते. लोकशाही गतिमान व परिपक्व करण्यासाठी विरोधी पक्ष अस्तित्वात असणे आवश्यक आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ही संसदीय लोकशाही रथाची दोन चाके आहेत, एक चाक कमकुवत असेल तर लोकशाहीचा गाडा व्यवस्थित चालू शकत नाही. देशाला हुकूमशाही पासून वाचवावयाचे असेल तर प्रबळ विरोधी पक्ष असलाच पाहिजे. डॉ. आंबेडकर यांनीही लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्ती म्हणून विरोधी पक्षांचा उल्लेख केलेला आहे.

**Article Indexed in :**
DOAJ Google Scholar DRJI
BASE EBSCO Open J-Gate

### २] विरोधी पक्ष संकल्पना :

संसदीय लोकशाहीत राजकीय पक्षाला लोकशाहीचे प्राण मानले जाते. लोकशाहीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक पक्षाचे अस्तित्व असते. तेथील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ज्या पक्षाला ब ाहुमत मिळते, तो पक्ष सत्ता संपादन करतो. अशा पक्षाला सत्तारुढ पक्ष म्हणतात. तर सत्तारुढ पक्षाच्या ख ालोखाल किंवा त्यानंतरचे संख्याबळ ज्या राजकीय पक्षाचे असते, त्याला किंवा सत्ता प्राप्त करु न शक लेल्या इतर पक्षांना विरोधी पक्ष असे म्हणतात.

भारतात १९७७ च्या कायद्यानुसार सार्वत्रिक निवडणुकीनंतर विरोधी पक्ष म्हणून संस देची अधिकृत मान्यता मिळविण्यासाठी कमीत-कमी त्या सभागृहातील कोरम किंवा गणपूर्ती एवढी किंवा सत्तारुढ पक्षानंतर दुसऱ्या क्रमांकाची सभागृहातील सदस्यसंख्या यातील जी संख्या मोठी असेल, तेवढी असावी लागते. असे असेल तर तो अधिकृत विरोधी पक्ष असतो व या पक्षाच्या सभागृहातील नेत्याला विरोधी पक्ष नेता असे म्हणतात.

### ३] विरोधी पक्षाचा उदय व विकास :

आज विरोधी पक्षाची संकल्पना ही एक आधुनिक संकल्पना आहे. परंतु विरोधी पक्षाची मुळे ही प्राचीन इतिहासात सापडतात. प्राचीन काळात अनेक देशात राजेशाही वा गणतंत्र पध्दतीत शासनाच्या धोरणात सुधारणा सुचविणारा एक वर्ग विरोधी पक्ष म्हणून कार्यरत ह ोता, हे अनेक उदाहरणावरुन स्पष्ट होते. आधुनिक काळातील विरोधी पक्षाचा उगम इंग्लडमध्येच झालेला आहे. इंग्लड हा देश लोकशाहीची व राजकीय पक्ष पध्दतीची जननी म्हणून ओळखला जातो . विरोधी पक्षाचा इतिहास हा दीड शतकापेक्षा जास्त प्रदिर्घ काळाचा आहे. इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाच्या विकासाचे मुळ हे राजा व सरदार यांच्यात सत्तेसाठी चाललेल्या संघर्षात सापडते. या सत्ता संघर्षात ा कांही सरदारांनी राज्याच्या सत्तेला विरोध केला, यातून सत्तेचे समर्थन करणारा किंवा टिका करणार ा विरोधी पक्ष उदयास आला. संसदेतील राजाच्या सत्तेचे समर्थन करणारा टोरी (हूजूर) व राजाच्या सत्त ेला विरोध करणारङ्गिं गट व्हिग (उदारमतवादी) या नावाने ओळखले जावू लागला आणि हाच खऱ्या अर्थाने राजकीय पक्ष व विरोधी पक्षाचा प्रारंभ होता.

### ४] महाराष्ट्रातील विरोधी पक्ष :

महाराष्ट्रातील राजकीय पक्षाला प्रदिर्घ असा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तत्कालीन मुंबई प्रांतात काँगेससह, साम्यवादी, मुस्लिम लीग, हिंदू महासभा इ. पक्ष कार्यर त होते. मात्र पारतंत्र्यामुळे राजकीय पक्ष म्हणून त्यांच्या कार्याला मर्यादा होत्या. स्वातंत्र्यानंत ार मुंबई राज्यात सत्ताधारी काँग्रेसह समाजवादी, कम्युनिस्ट पक्ष, जनसंघ, शेतकरी कामगार पक्ष, रिप्ब्लीकन प ार्टी ऑफ इंडिया, या राजीय पक्षांनी येथे लोकसंघटन करुन शासन निर्णयाला मर्यादित स्वरुपात प्र भावित केलेले

दिसते. कारण काँगेस पक्षाच्या पाठीशी स्वातंत्र्य आंदोलनाची पुण्याई असल्याने मुंबई राज्ाात विरोधी पक्षाच्या प्रभावाला फारसा अवकाश किंवा वाव मिळालोला नाही. परंतु संयुक्त महाराष्ट्र च ळवळीने व त्यातून निर्माण झालेल्या आंदोलनाने खऱ्या अर्थाने विरोधी पक्षाला वाव मिळाला. १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसविरोधी सर्व राजकीय पक्ष एक आले व त्यांनी मराठी भाषिक प्रदेशात काँग्रेसला पराभूत केले. काँग्रेसची या निवडणुकीतील पिछेहाट व संयुक्त महाराष्ट्र निर्मि तीसाठी समितीच्या माध्यमातून संघटित झालेल्या लोकमताच्या दबावानेच महाराष्ट्र निर्मितीचा मार्ग मोकळा केला. मुंबई राज्यात विरोधी पक्षांनी संसदबाह्य व संसदीय मार्गाने शासनावर दबाव निर्माण केल्यानेच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली, हा इतिहास आहे. त्यानंतर मात्र प्रबळ विरोधी पक्ष निर्माण न झाल्यामुळे किंवा विरोधी पक्षाने आपली भुमिका न बजावल्याने विरोधी पक्षांना शासकीय धोर ण निर्मिती प्रक्रिया प्रभावित करण्यात क्वचितच यश मिळाल्याचे दिसते.

## ५] संसदीय आयुधे - विरोधी पक्षाची अस्त्रे :

भारतीय संसद हे लोकशाहीचे मूल्य जपणारे उच्चतम स्थल आहे. या संसदेत शासनावर अंकुश ठेवण्यासाठी भारतीय राज्यघटनेत कलम १०५ (१) अंतर्गत व १०७ ते ११७ पयंत संसदीय आयुधांची तरतूद केली गेलेली आहे. या आयुधांचा वापर लोकशाहीच्या संरक्षणासाठी विरोधी पक्ष करत असतो व त्याच्या प्रभावी वापरावरच लोकशाहीचे यश अवलंबून असते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष खालील संसदीय आयुधांचा वापर करत असतो.

### १) प्रश्नोत्तरे :

दोन्ही सभागृहांच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. विधीमंडळ ात जे प्रश्न विचारले जातात. त्यांचे तीन प्रकार असतात ते म्हणजे तारांकित प्रश्न, अल्पसुचना प्रश्न, अतारांकित प्रश्न होय..या प्रश्नोत्तरामुळे शासनाला त्याच्या उणिवा दाखविल्या जातात व त्या दुर करता येतात.

### २) प्रस्ताव :

सभागृहात विविध विषयांवर चर्चा करणे, विचार करणे या बाबीला अंत्यत महत्व आहे. यासाठी विविध प्रकारचे प्रस्ताव मांडून चर्चा घडवून आणली जाते. त्याद्वारे सरकारवर नियंत्रण ठेवले जाते. उदा. स्थगन प्रस्ताव, अविश्वासाचा प्रस्ताव इ. या व अशा प्रस्तावावरील चर्चेचे चार भाग पडतात ते म्हणजे ःॅ

१. प्रस्ताव मांडणे

२. प्रश्न मा. अध्यक्षांनी सभाग्रहासमोर ठेवणे.

३. चर्चा

४. मतदान व निर्णय हे होय.

तसेच सर्वसाधारण प्रस्तावाचे तीन भाग पडतात ते म्हणजे ⇒

१. मुळ प्रस्ताव

२. बदली प्रस्ताव

३. अंगभुत प्रस्ताव हे होय.

**३) लक्षवेधी सुचना :**

१९५८ साली लक्षवेधी सुचना संबंधीची तरतूद नियमात करण्यात आली. यामुळे एखादी महत्वाची व तातडीची बाब सभागृहासमोर उपस्थित करण्यासाठी स्थगन प्रस्तावाचे आयुध उपलब्ध होते. त्या व्यतिरिक्त एखाद्या स्वंतत्र आयुधाची निकड ध्यानात घेऊन निकडीच्या सुचनेचा नि यमात समावेश करण्यात आला. निकडीच्या व सार्वजनिक महत्वांच्या बाबीकडे संबधीत मंत्र्याचे लक्ष वेधण्यासाठी जी सुचना दिली जाते, तिला 'लक्षवेधी सुचना' असे म्हणतात. आधुनिक संसदीय कामका ज पध्दतीमध्ये लक्षवेधी सुचनेचा सभागृहातील कामकाज पदधतीतील समावेश ही संपूर्णतः भार तीय संकल्पना (Purly an Indian Innovation)आहे.

**४) अर्धा तास चर्चा :**

संसदीय आयुधांपैकी अर्धा तास चर्चा हे विधीमंडळांमध्ये वापरले जाणारे महत्वा चे संसदीय आयुध आहे. प्रश्नातून उद्भवणाऱ्या तसेच सार्वजनिक महत्वाचा बाबींवर उपस्थित करावयाच्या चर्चा यांचा समावेश या अर्धा तास चर्चा यात करण्यात आलेला आहे. सिमीत व्याप्तीचे विषय या माध्यमातून उपस्थित केले जातात.

**५) अल्पकालीन चर्चा :**

निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयांवर चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक महत्‍ाचे आयुध सदस्यांना १९५८ साली उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. या चर्चेला जास्तीत जास्त अड ीच तास वेळ मिळतो. यामुळे विरोधी पक्षांच्या सदस्यांना तातडीने सार्वजनिक महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी एक जादा संधी मिळते. परिणामी अल्पकालीन चर्चेचे आयु ध सदस्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त व समाधानकारक असे सिध्द झालेले आहे. अशा प्रकारच्या सु चना अधिवेशन सुरु होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर द्याव्या लागतात.

### ६) अंतीम आठवडा प्रस्ताव :

१९७१ साली या प्रस्तावासंबंधीच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. सार्वजनिक महत् वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्यांना ही एक अतिरिक्त संधी उपलब्ध झालेली आहे. या प्रस्तावाचा उद्देश म्हणजे सभागृह स्थगित होण्यापुर्वीच्या निकटच्या कालावधीतच अडचणी, समस् या, प्रश्न सभाग्रहासमोर आणणे हा आहे. या प्रस्तावाद्वारे राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यापक व सार्वजनिक महत्वाचे विषय सभागृहासमोर मांडता येतात. उदा. महागाई, कायदा, व सुव्यवस्था, इ.

### ७) ठराव :

ठराव हे महत्वाचे संसदीय आयुध आहे. महत्वाच्या सार्वजनिक हिताच्या बाबीवर स ाभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक उपयुक्त माध्यम सदस्यांना उपलब्ध आहे. सार्वजनिक महत् वाच्या विषयावर सभागृहाचे मत जाणून घेणे अथवा शिफारस करणे या उद्देशाने सदस्यांना सभागृह ात ठरावाच्या स्वरुपात प्रस्ताव मांडून शासनाच्या एखाद्या कृतीविषयी ध्येय - धोरणाविषयी मत व्यक्त करत ा येते, तसेच लक्ष वेधता येते. ठराव हा एक मुळ प्रस्तावच आहे. या ठरावाचे अशासकीय ठराव, शास किय ठराव, वैधानिक ठराव हे तीन प्रकार आहेत.

## ६] संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका व कार्य :

### १) सरकारच्या धोरणावर नियंत्रण ठेवणे :

सरकारच्या धोरणावर, कार्यावर नियंत्रण ठेवणे, ही विरोधीय पक्षाची महत्वाचे कार्य आहे. सरकारला त्याच्या जास्तीत जास्त चूका दाखविणे व त्याद्वारे स्वत:चा जास्तीत जास्त र ाजकीय फायदा करुन घेणे, हे कार्य विरोधी पक्ष पार पाडत असते.

### २) जनतेचे प्रश्न मांडणे :

विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षामुळे जनतेचे प्रश्न वेळोवेळी मांडत असते. तसेच स रकारचे लक्ष याप्रश्नांकडे वेधून घेवून ते सोडविण्यासाठी शासनावर दबाव आणण्याचे कार्य ही करत असते

### ३) लोकशाहीचे संरक्षण :

विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर त्याच्या कार्यावर, धोरणावर नियंत्रण ठेवून, त्याच या हुकूमशाही वृत्तीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असतो. तसेच अल्पसंख्याकाचे प्रश्न मांडण याचे कार्य करुन ही खऱ्या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना व संरक्षण करण्याचे कार्य विरोधी पक्ष करीत असतो. अशा प्रकारे वरिल संसदीय आयुधे ही विरोधी पक्षाला उपलब्ध करुन

देण्यात आलेले आहेत या आयुधांचा प्रखर वापर विरोधी पक्षाने केला तरच सत्ताधारी पक्षावर नियंत्रण मिळविता येते आणि खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाहीची प्रस्थापना होवू शकते.

## ७] संदर्भ :

०१) आजचा महाराष्ट्र, युनिक ॲकडेमी, २०११.

०२) कश्यप, सुभाष, भारतीय संसद : विषय की भुमिका नैशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९९८.

०३) कळसे अनंत, १४ नोव्हेंबर, २००९, महाराष्ट्र विधान मंडळ - एक दृष्टीक्षेप, महाराष्ट्रविधान मंडळ सचिवालय, मंुबई.

०४) गिरमे, के.टी, १७ जुलै, १९६६, विधानसभा - परिचय व कामकाज , रुचि प्रकाशन, पुणे.

०५) जोशी, डॉ. सुधाकर, आवृत्ती पहिली, जुन, २००३, भारताचे शासन व राजकारण, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.

०६) पळशीकर सुहास, सुहास कुलकर्णी (संपा), महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, २००७

०७) पळशीकर सुहास, बिरमल नितीन - महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ.

०८) पाटील पी. बी. - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण.

०९) भोळे, भा. ल., भारताचे स्वातंत्र्य पन्नास वर्षाचा मागोवा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद २०१२.

१०) महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, विधानभवन मुंबई, २०११

११) राजनिती कोश - कश्यप सुभाष, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, १९९६.

१२) राजनीती विज्ञान - अशोक कुमार